.nagpur

NMC e NEWS LETTER

ऑक्टोबर २०१९

/nmcngp/ /ngpnmc/ www.nmcnagpur.gov.in/ http://news.nmcnagpur.org/

## थोडक्यात...

### सार्वजनिक ठिकाणी थुंकणे व उघड्यावर लघवी करणा–या २३८४ जणांवर कारवाई

**मनपा उपद्रव शोध पथकाची कामगिरी**

**मनपा मुख्यालय परिसरातही ११० जणांकडून दंड वसूल**

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाद्वारे सार्वजनिक ठिकाणी थुंकणे व उघड्यावर लघवी करणा–या २३८४ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. दहाही झोनमधील पथकाद्वारे ११ डिसेंबर २०१७ ते १० ऑक्टोबर २०१९ दरम्यान ही कारवाई करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, सिव्हीरल लाईन्स येथील मनपा मुख्यालय परिसरातही उपद्रव शोध पथकाद्वारे उघड्यावर लघवी व थुंकणा–या ११० जणांवर कारवाई करुन दंड वसूल करण्यात आला आहे.मनपा आयुक्त अभिजीत बांगर, अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांच्या मार्गदर्शनात उपद्रव शोध पथकाचे स्कॉड लिडर विरसेन तांबे यांच्या नेतृत्वात पथकाद्वारे कारवाई सुरू आहे. नियमांचे उल्लंघन करुन शहर विद्रुप करणा–यांवर कारवाई करण्यासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे उपद्रव शोध पथक तैनात करण्यात आले आहे. झोन स्तरावर पथकाची नेमणूक करण्यात आली असून पथकामध्ये ८७ जणांचा समावेश आहे. उपद्रव शोध पथकाद्वारे ११ डिसेंबर २०१७ ते १० ऑक्टोबर २०१९ या कालावधीत सार्वजनिक ठिकाणी थुंकणा–या १०५२ जणांवर कारवाई करुन ९५ हजार ८०० रुपये दंड वसूल केला तर उघड्यावर लघवी करणा–या १३३२ जणांकडून २ लाख ९ हजार ७०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. दोन्ही कारवाईमध्ये एकूण २३८४ जणांकडून ३ लाख ५ हजार ५०० रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

### नागपूर महानगरपालिकेद्वारे चार नविन बस शेल्टरचे निर्माण

नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन विभागामार्फत आकाशवाणी चौक ते विधानभवन या मार्गावर अतिरिक्त चार नवीन बस शेल्टर तयार करण्यात आले आहेत. या नवीन बस शेल्टरवरून आता प्रवाशांना बसमध्ये चढ उतार करताना सुविधा होणार आहे. आकाशवाणी चौक ते विधान भवन या भागात शासकीय कार्यालये असल्याने नागरिक मोठ्या प्रमाणावार आपली बसचा उपयोग करत असतात. या मार्गावर दुचाकी, चारचाकी वाहने असल्याने वाहतूकीची कोंडी होत असते. ही वाहतूक कोंडी रोखण्यासाठी परिवहन विभागाने चार अतिरिक्त बस शेल्टर विविध मार्गांसाठी नियोजित केले आहेत. पूर्वी या मार्गावर दोन बस शेल्टर असल्याने नागरिकांना बसमध्ये चढताना व उतरताना त्रास व्हायचा. आता नवीन सहा बस शेल्टर तयार झाले आहेत. डीएएपीटी बस शेल्टर, आकाशवाणी चौक बस शेल्टर, आयसीआयसीआय बँक समोर बस शेल्टर, नारंग टॉवर, विधानभवन बस शेल्टर, इलाहाबाद बस शेल्टर असे नवीन सहा बस शेल्टर आहेत.

### पोर्णिमा दिवसाच्या निमित्ताने अशोक चौकात जनजागृती



अनावश्यक वीज दिवे बंद करून वीज बचतीचे आवाहन : मनपा–ग्रीन व्हिजीलचा उपक्रम

पोर्णिमेच्या उजेड्या रात्री चंद्राचा प्रकाश असतो. त्यामुळे या प्रकाशात फारशा वीज दिव्यांची गरज नाही. किमान अशा उजेड्या रात्री अनावश्यक वीज दिवे बंद करा. वीज बचतीच्या महाअभियानात सहभागी व्हा, असे आवाहन करीत मनपा अधिकारी–कर्मचारी आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशनच्या स्वयंसेवकांनी ग्रेट नाग रोडवरील अशोक चौकात जनजागृती केली. नागपूर महानगरपालिका आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशनच्या संयुक्त विद्यमाने प्रत्येक पोर्णिमेला पोर्णिमा दिवस उपक्रम राबविण्यात येतो. यानिमित्ताने नागपूरकरांना रात्री ८ ते ९ या वेळेत घरातील व दुकानातील अनावश्यक वीज दिवे बंद करण्याचे आवाहन करण्यात येते. मंगळवारी (ता. १५) ग्रेट नाग रोडवरील अशोक चौकात जनजागृती अभियान राबविण्यात आले. मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांच्या मार्गदर्शनात विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता ए.एस. मानकर आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशनचे संस्थापक कौस्तभ चॅटर्जी यांच्या नेतृत्वात मनपा कर्मचारी व ग्रीन व्हिजील फाऊंडेशनच्या स्वयंसेवकांनी व्यापाऱ्यांना अनावश्यक वीज दिवे बंद करण्याचे आवाहन केले. मनपा आणि ग्रीन व्हिजील फाऊंडेशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या या अभियानाची माहिती देत मागील काही वर्षांत यामाध्यमातून किती वीज बचत करण्यात आली, याबाबत सांगितले. यापुढेही प्रत्येक पोर्णिमेला असाच उपक्रम स्वयंस्फूर्तीने राबविण्याचे आवाहनही केले. स्वयंसेवकांच्या आवाहनाला दाद देत व्यापाऱ्यांनी व नागरिकांनी आपल्या प्रतिष्ठानातील, घरातील अनावश्यक वीज दिवे एक तास बंद ठेवत अभियानात सहभाग नोंदविला. मनपातर्फेही परिसरातील पथदिवे एक तासाकरिता बंद करण्यात आले होते.

# शहरात ओडीएफ प्लस प्लस मानांकनासाठी दर्जेदार सुविधा द्या – आयुक्त

## स्वच्छ सर्वेक्षणाच्या कामासंदर्भात कर्मचाऱ्यांची कार्यशाळा शहराला ओडीएफ ++ मानांकन मिळविण्यासाठी प्रयत्न करणार



शहराला ओडीएफ प्लस मानाकंन प्राप्त झाले आहे. आता शहराला ओडीएफ प्लस प्लस मानांकन मिळविण्यासाठी मनपा प्रयत्न करत आहे. ओडीएफ प्लस प्लस मानाकंनासाठी शहरातील सर्व सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांना दर्जेदार सुविधा द्यावा, असे निर्देश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले. शहरातील स्वच्छतेबाबत कुठलिही हलगर्जी चालवून घेणार नाही. शहरातील स्वच्छता ही प्राधान्याने करावी. शहरातील सार्वजनिक व सामूदायिक शौचालयेही सुस्थितीत व स्वच्छ ठेवावी, त्याठिकाणी कुठलिही अस्वच्छता नको. तसेच शहरातील स्वच्छतेच्या कामांबद्दल सकारात्मकता बाळगा, असे निर्देश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले. स्वच्छ सर्वेक्षण २०२० च्या पार्श्वभूमीवर आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांची व अधिकाऱ्यांची कार्यशाळा शुक्रवारी (ता.१८) महाल येथील राजे रघूजी भोसले नेताजी नगर भवन येथे आयोजित करण्यात आली होती. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अतिरिक्त आयुक्त राम जोशी, उपायुक्त निर्भय जैन, आरोग्यधिकारी डॉ. सुनील कांबळे, स्वच्छ भारत अभियानाचे नोडल अधिकारी डॉ.प्रदीप दासरवार, ग्रीन व्हिजीलचे कौस्तभ चॅटर्जी, सेन्टर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंटच्या लीना बुधे प्रामुख्याने उपस्थित होते.प्रारंभी आयुक्त अभिजीत बांगर यांनी स्वच्छ सर्वेक्षण २०२० बाबत शासनाने दिलेल्या मार्गदर्शिकेबाबत चर्चा केली. या वर्षी स्वच्छ सर्वेक्षण हे चार प्रमुख मुद्द्यांवर अवलंबून असल्याची माहिती त्यांनी दिली. नागपूर शहराला ओडीएफ प्लस मानांकन मिळाले आहे. आता शहराला ओडीएल प्लस प्लस हे मानांकन मिळावे यासाठी मनपा प्रयत्न करणार आहे. शहरातील सर्व सार्वजनिक व सामूदायिक शौचालये हे स्वच्छ ठेवण्यासाठी सर्व स्वच्छता कर्मचाऱ्यांनी काय उपाययोजना कराव्या याचे मार्गदर्शन यावेळी आयुक्तांनी केले.शहरातील सर्व सार्वजनिक शौचालये ही सुलभ या संस्थेमार्फत चालविण्यात येतात. ज्या नागरिकांना वैयक्तिक शौचालये उपलब्ध नाहीत त्यांच्यासाठी सामूदायिक शौचालये निर्माण केली आहे. यानंतर प्रत्येक शौचालयामागे एक नोडल अधिकारी, जामादार, स्वच्छता कर्मचारी नेमून देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या सर्व कर्मचाऱ्यांवर त्यांच्या झोनल अधिकारी व सहायक आयुक्तांनी लक्ष ठेवावे, असे आदेश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले. सर्व सार्वजनिक शौचालये व सामूदायिक शौचालये ही प्रत्येक तासामागे स्वच्छ दिसेल याची काळजी स्वच्छता कर्मचाऱ्यांनी घ्यायची आहे. ओडीएफ प्लस प्लस मानांकन मिळविण्यासाठी शासनाने दिलेल्या मार्गदर्शिकेबाबत त्यांनी माहिती दिली. त्यात २४ तास निरिक्षक, सफाई कामगार राहील याची दक्षता घ्यावी. दर्जेदार स्वच्छता व पुरेसे मनुष्यबळ शौचालयात असणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. शौचालयातील नळाला पुरेसे पाणी असणे अत्यावश्यक आहे. नसल्यास जलप्रदाय विभागाकडून पाण्याची व्यवस्था करून घेण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. स्वच्छतेच्या बाबतीत शौचालय स्वच्छ केल्यानंतर फरशी ओली राहता कामा नये, ती पुसून कोरडी करून स्वच्छ ठेवावी. शौचालयातील आरसे हे सुस्थितीत असलेले दिसले पाहिजेत. प्रत्येक शौचालयात कचरा पेटी असणे अत्यावश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. पाणी गळतीची जागा शोधून त्याठिकाणी डागडूजी करण्यात यावी, संबंधित कार्यकारी अभियंत्यांनी या गोष्टींकडे लक्ष देण्याचे निर्देश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले.

## कामात निष्काळजीपणा करणाऱ्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करा – आयुक्त



समन्वयन बैठकीत सर्व विभागांना निर्देश : शहरातील खड्डे दुरूस्तीचा घेतला आढावा

शहरातील खड्डे दुरूस्ती संदर्भात समन्वयन समितीच्या मागील बैठकीमध्ये सात दिवसात शहरातील खड्डे बुजविण्याचे आदेश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले होते. दिलेल्या आदेशाची काय प्रगती आहे, याचा आढावा घेण्यासाठी शनिवारी समन्वयन समितीची दुसरी बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीमध्ये आढावा घेताना समाधानकारक स्थिती न दिसून आल्याने आयुक्तांनी नाराजी व्यक्त करत कामात निष्काळजीपणा करणाऱ्या कंत्राटदारांवर व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे निर्देश सर्व विभागांना दिले. सर्व शासकीय यंत्रणेच्या विभागाच्या अधिकाऱ्यांनी स्वतः रस्त्यावर फिरून कुठे खड्डे दिसून येत असेल तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना याबाबत अवगत करावे, यासंबंधी आता हलगर्जीपणा आणि निष्काळजीपणा चालणार नाही, असे निर्देश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले. उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार भादंवि कलम २८३ अन्वये रस्ता जर वापरण्यायोग्य नसेल आणि त्यारस्त्यावर जर अपघात झाला तर संबंधित कंत्राटदारावर फौजदारी गुन्हा नोंदविला जाणार आहे. जर कंत्राटदारावर गुन्हा नोंदविला नाही तर भादंवि कलम २१७ अन्वये संबंधित अधिकाऱ्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर गुन्हा नोंदविला जाणार असल्याची माहिती आयुक्तांनी यावेळी दिली. शहरात सुरू असणाऱ्या विविध कामांचा आढावा त्यांनी बैठकीत घेतला. मागील बैठकीत सर्व विभागांना त्यांच्या अखत्यारित असेलेल्या रस्त्यांची यादी देण्यात आली होती. परंतु त्यापैकी काही रस्त्यांवरील खड्ड्यांची डागडूजी झाली. परंतु अद्यापही अन्य रस्त्यांवरील खड्डे दुरूस्त करण्यात आले नसल्याचे आयुक्तांनी सांगितले.

## स्वच्छता आणि सुरक्षेबाबत विशेष काळजी घ्या : आयुक्त अभिजीत बांगर

**धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या तयारीचा आयुक्त व जिल्हाधिका–यांनी घेतला आढावा**



धम्मचक्र प्रवर्तन दिनाला दीक्षाभूमीवर लाखो अनुयायी येतात. देशाच्या विविध भागातून येणा–या आंबेडकरी अनुयायांना मनपातर्फे योग्य सुविधा पुरविणे आवश्यक आहे. दीक्षाभूमी व संपूर्ण परिसरात स्वच्छता कायम राहावी व नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक बाबींची पूर्तता करुन नागरिकांना कोणतिही असुविधा होउ नये याबाबत विशेष काळजी घ्या, असे आवाहन मनपा आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले. प्रारंभी आयुक्त अभिजीत बांगर यांनी दीक्षाभूमी येथे भगवान गौतम बुद्ध व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थी कलशाला पुष्प अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी त्यांनी संपूर्ण दीक्षाभूमी परिसरातील तयारीची पाहणी केली. आवश्यक दुरुस्त्यांबाबत संबंधित अधिका–यांना निर्देशही दिले. नागरिकांच्या सुविधांसाठी मनपातर्फे महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र तात्पुरते प्रसाधनगृह निर्माण करण्यात येत असून याचीही पाहणी आयुक्तांनी केली. लाखो अनुयायांच्या सुविधेसाठी कार्यरत स्वच्छता कर्मचा–यांच्या आरोग्याचीही काळजी घेणे आवश्यक आहे. स्वच्छता कर्मचा–यांनी जॅकेट, हॅण्ड ग्लोज, मास्क आदी सुरक्षा साहित्य वापरूनच कार्य करावे. त्यांच्या कार्यावर योग्य देखरेख ठेवणे व वेळोवेळी योग्य सूचना देण्यासाठी प्रभारींची नियुक्ती करण्यात यावी. तात्पुरत्या प्रसाधनगृहांमध्ये नेहमी स्वच्छता राहावी याची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. या ठिकाणी आवश्यक मनुष्यबळ तैनात करणे तसेच दुर्गंधी पसरू नये यासाठी आवश्यक फवारणी करणेही आवश्यक आहे. प्रसाधनगृह ठिकाणी स्वच्छतेबाबत कोणतिही तक्रार येउ नये यासाठी प्रत्येक ५ ते १० प्रसाधनगृहांच्या स्वच्छतेसाठी एक स्वच्छता कर्मचारी नियुक्त करुन चोविस तास अविरत स्वच्छता राहावी यासाठी वेळेनुसार त्यांच्या ड्युटी लावण्याचेही निर्देश आयुक्तांनी दिले. नागरिकांच्या आरोग्य सुविधेसाठी मनपा व शासनाच्या रुग्णवाहिका सेवेत तैनात ठेवण्यात याव्यात. वैद्यकीय सुविधांच्या स्टॉल्सवर आवश्यक औषधांचा पुरवठा व्हावा याची काळजी घेण्याचेही त्यांनी निर्देशित केले. नागरिकांच्या सुरक्षेसाठी अग्निशमन विभागाने आपली यंत्रणा तैनात ठेवण्याचेही निर्देश आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिले. नागरिकांना आवश्यक सोयी सुविधा पुरविल्या जाव्यात यासाठी दीक्षाभूमी परिसरामध्ये मनपाचे उपद्रव शोध पथकही तैनात करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

# विना परवानगी सार्वजनिक ठिकाणी बांधकाम साहित्य ठेवणा–या ७०५९ जणांवर कारवाई

## मनपा उपद्रव शोध पथकाची कामगिरी : सर्वाधिक प्रकरण आसीनगर झोनमध्ये

सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी विना परवानगी बांधकाम साहित्य ठेवणे व प्रथम ४८ तासात हटविण्याची नोटीस देउनही न हटविल्याने मनपाच्या उपद्रव शोध पथकाद्वारे ७०५९ जणांवर कारवाई करण्यात आली आहे. ११ डिसेंबर २०१७ ते १० ऑक्टोबर २०१९ या कालावधीमध्ये दहाही झोनमधील पथकाद्वारे सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी विना परवानगी बांधकाम साहित्य ठेवणे व प्रथम ४८ तासात हटविण्याची नोटीस देउनही न हटविणा–या ६९३० व्यक्तींवर व १२९ बिल्डर्सवर अशा एकूण ७०५९ जणांवर कारवाई करण्यात आली. मनपा आयुक्त अभिजीत बांगर, अतिरिक्त आयुक्त राम जोशी यांच्या मार्गदर्शनात उपद्रव शोध पथकाचे स्कॉड लिडर विरसेन तांबे यांच्या नेतृत्वात पथकाद्वारे कारवाई सुरू आहे. नियमांचे उल्लंघन करुन स्वच्छ, सुंदर शहर संकल्पनेमध्ये अडसर निर्माण करणा–यांना अंकुश लावण्यासाठी नागपूर महानगरपालिकेचे उपद्रव शोध पथक कार्य करीत आहे.उपद्रव शोध पथकाद्वारे ११ डिसेंबर २०१७ ते १० ऑक्टोबर २०१९ या कालावधीत सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी विना परवानगी बांधकाम साहित्य ठेवणे व प्रथम ४८ तासात हटविण्याची नोटीस देउनही न हटविणा–या ६९३० व्यक्तींवर कारवाई करुन १ कोटी १७ लाख ४२ हजार रुपये तर १२९ बिल्डर्सवर कारवाई करुन ८ लाख २९ हजार रुपये असे एकूण १ कोटी २५ लाख ७१ हजार रुपये दंड वसूल करण्यात आले.

# सावधान..! आपल्या घरातही तयार होऊ शकतो डेंग्यूचा मच्छर

## डेंग्यूपासून बचावासाठी मलेरिया विभागाच्या सूचना : कुलर, फ्लॉवरपॉटचे पाणी काढण्याचे आवाहन

आपल्या घरातही डेंग्यूचा मच्छर तयार होऊ शकतो. जर आपल्या घरात बंद असलेल्या कुलरमध्ये पाणी असेल, फ्लॉवर पॉटमधील पाणी आपण दररोज बदलवित नसाल आणि आजुबाजूला पडलेल्या गाड्यांच्या टायरमध्ये पाणी साचले असेल तर अशा ठिकाणी डेंग्यूच्या मच्छरांची पैदास होऊ शकते. म्हणून नागरिकांनी काळजी घेत अशा ठिकाणचे पाणी वेळोवेळी काढावे, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेच्या मलेरिया विभागातर्फे करण्यात आले आहे.मलेरिया व हत्तीरोग विभागाच्या प्रमुख जयश्री थोटे यांनी याबाबत माहिती देताना सांगितले की, डेंग्यूचा मच्छर स्वच्छ पाण्यात तयार होतो. त्याची पैदास साठवून असलेल्या स्वच्छ पाण्यात गतीने होते. त्यामुळे कुठल्याही ठिकाणी स्वच्छ पाणी एक दिवसापेक्षा अधिक वेळ जमा राहू देऊ नये. घरात लावलेल्या कुलरचा सध्या उपयोग नसेल तर त्यातील पाणी काढून ते कोरडे करणे आवश्यक आहे. घरात असलेल्या फ्लॉवर पॉट मधील पाणीसुद्धा डेंग्यू मच्छरांचे पैदास केंद्र होऊ शकते. त्यामुळे फ्लॉवर पॉटमधील पाणीसुद्धा दररोज बदलणे आवश्यक आहे.श्रीमती जयश्री थोटे म्हणाल्या, टीन कंटेनर, सिमेंटच्या टाक्या, प्लास्टिकची भांडी, मातीची भांडी आदी ठिकाणीसुद्धा डेंग्यू मच्छरांची पैदास होऊ शकते. मलेरिया, हत्तीरोग विभागातर्फे वेळोवेळी सर्वेक्षण करून डेंग्यू मच्छरांच्या पैदासीवर प्रतिबंध घालण्याचा प्रयत्न केला जातो. विभागातर्फे ७८७ कर्मचाऱ्यांची टीम शहरात कार्यरत आहे. मनपाच्या वतीने डेंग्यू मच्छर पैदास होणाऱ्या संभाव्य ठिकाणी किटकनाशकांची फवारणी केली जाते. सार्वजनिक विहिरींमध्ये, डबक्यांमध्ये गप्पी मासे सोडले जातात. यामुळे मच्छरांची पैदास होत नाही. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून डेंग्यू मच्छरांची पैदास होऊ नये या दृष्टीने घरातील संभाव्य जागा कोरड्या ठेवण्याचे आवाहन केले आहे.

### दोन लाखांच्यावर रुग्णांची मलेरिया तपासणी

नागपूर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांतर्फे होत असलेल्या सर्वेक्षणादरम्यान ज्या ठिकाणी डेंग्यूचे मच्छर आढळून येतात त्या घरातील व्यक्तींच्या रक्तांचे नमुने घेतले जातात. डेंग्यूचे निदान करण्याच्या दृष्टीने रक्ततपासणी केली जाते. जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्यात मनपातर्फे मलेरियाच्या निदानासाठी १८७५११ रक्तनुमने घेण्यात आल्याची माहिती हत्तीरोग व हिवताप रोग नियंत्रण अधिकारी जयश्री थोटे यांनी दिली. डेंग्यूचे ४९० रुग्ण आढळले असून त्यातील २०९ रुग्ण नऊ महिन्यात 'पॉझिटीव्ह' असल्याचे चाचणीअंती निष्पन्न झाले.जानेवारी ते सप्टेंबर या नऊ महिन्याच्या कालावधीत २०१८१५ रुग्णांची मलेरिया निदानासाठी रक्त तपासणी करण्यात आली. जानेवारी महिन्यात २००४७, फेब्रुवारी महिन्यात २४०४८, मार्च महिन्यात १९९१८, एप्रिल महिन्यात १८४३५, मे महिन्यात १९९१८, जून महिन्यात १७२३९, जुलै महिन्यात २५५६९, ऑगस्ट महिन्यात २९४६७ तर सप्टेंबर महिन्यात २७१७४ रुग्णांची रक्ततपासणी करण्यात आली. मलेरियाने कुणीही दगावला नसल्याचे अहवालात म्हटले आहे.

## थोडक्यात...